नि.क्र. १९ खाली/क

फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी
मी या व्दारे सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो कीः

माझे नाव - सिमा राजेंद्र खरीवले,
वय - ३६ वर्षे,
धंदा - गृहीणी,
राहणार - नवीन पोसरी, मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड.

**सरतपास फिर्यादी तर्फे विधीज्ञ श्री. जयेश तावडे यांचे मार्फत शपथेवर सुरु....**

१२) माझ्या सरतपासाच्या शपथपत्रामधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून तो वाचून मी त्यावर सही केलेली आहे. आता मला दाखवण्यात आलेल्या निशाणी ४ वरील कागद यादी सोबत दाखल आरोपीने मला दिलेल्या कॅनरा बँक, शाखा पनवेलचा धनादेश क्र. ७८८१११ दि. ०५/०९/२०२३ रोजीचा धनादेशाची मुळ प्रत तीच आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. चेकला **निशाणी २८** देण्यात येत आहे. आता मला दाखवण्यात आलेल्या निशाणी ४ वरील कागद यादीसोबत दाखल चेक न वटल्याबाबत बँक ऑफ इंडीया, शाखा मोहोपाडा यांनी दिलेला मेमो तोच आहे. त्यावर बँकेचा शिक्का व संबंधीत अधिकारी यांची सही आहे. मेमोस **निशाणी २९** देण्यात आली. आता मला दाखवण्यात आलेला निशाणी ४ वरील कागद यादी सोबत दाखल धनादेश क्रमांक ७८८११२ ची मुळ प्रत तीच आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. धनादेशास **निशाणी ३०** देण्यात आली. आता मला दाखवण्यात आलेला निशाणी ४ वरील कागद यादीसोबत दाखल बँक ऑफ इंडीया, शाखा मोहोपाडा यांच्याकडील चेक न वटल्याबाबतचा मेमो तोच आहे. त्यावर बँकेचा शिक्का व संबंधीत अधिकारी यांची सही आहे. मेमोस **निशाणी ३१** देण्यात आली.

**फिर्यादीच्या वकीलांच्या विनंतीवरुन सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.01.15 17:33:26 +0530

**( डी. एस. खोत )**
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
कोर्ट क्र.२, खालापूर.

स्थळ - खालापूर.
दिनांक - १५/०१/२०२६